# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:18.10.2025** **वार:शनिवार**

1. आदि कर्मयोगी अभियानात सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी गडचिरोली जिल्ह्याला राष्ट्रपतींच्या हस्ते पुरस्कार प्रदान
2. नाशिकमध्ये तयार झालेल्या पहिल्या तेजस लढाऊ विमानाचं संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांच्या उपस्थितीत लोकार्पण
3. अतिवृष्टी आणि पूरग्रस्त जिल्हयांसाठी 1 हजार 356 कोटीच्या मदतीला मान्यता
4. छत्तीसगडमध्ये पुन्हा 210 नक्षलवाद्याचं आत्मसमर्पण आणि
5. राहुरीचे विद्यमान आमदार शिवाजीराव कर्डिले यांचं निधन

**<u>राष्ट्रपती</u>**

देशातल्या प्रत्येक आदिवासी गावाला स्वावलंबी आणि स्वयंपूर्ण बनवण्याच्या उद्देशाने आदिकर्मयोगी अभियान सुरू करण्यात आल्याचं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आयोजित आदि कर्मयोगी अभियानावरच्या राष्ट्रीय परिषदेला त्यांनी काल संबोधित केलं. यावेळी राष्ट्रपती मुर्मू यांच्या हस्ते धरती आबा जनभागीदारी अभियानामध्ये सर्वोत्कृष्ट राज्य म्हणून महाराष्ट्र आणि आदि कर्मयोगी अभियानात सर्वोत्कृष्ट कामगिरीसाठी गडचिरोली जिल्ह्याला पुरस्कार देऊन गौरवण्यात आलं.

**<u>राजनाथसिंह</u>**

नाशिकमध्ये निर्माण करण्यात आलेल्या पहिल्या तेजस या लढाऊ विमानाचं लोकार्पण काल संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या उपस्थितीत झालं. या विमानानं यावेळी आकाशात झेप घेतली. हिंदुस्थान एरोनॉटिक्स लिमिटेडच्या ओझर इथल्या प्रकल्पात तेजस च्या तिसऱ्या उत्पादन साखळीचा आणि एचटीटी 40 या प्रशिक्षणार्थी विमानाच्या दुसऱ्या उत्पादन साखळीचा प्रारंभ काल संरक्षण मंत्र्यांनी केला.

भारताला संरक्षण उत्पादनात आत्मनिर्भर बनवण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चार त्यांनी यावेळी केला. नाशिकमध्ये तयार झालेल्या विमानांचं हे उड्डाण देशाच्या स्वावलंबनाचं प्रतीक असल्याचं ते यावेळी म्हणाले. नाशिकची भूमी अध्यात्मिकतेबरोबरच आत्मनिर्भरतेचं प्रतीक आहे. भविष्यात इथे मोठी रोजगार निर्मिती होईल असा विश्वास राजनाथ सिंह यांनी व्यक्त केला....

**और मुझे पूरा विश्वास है नाशिक आने वाले समय में इन सभी क्षेत्रों में बहुत ही अपनी अहम भूमिका का निर्वाह करेगा यह विश्वास लेकर मैं यहाँ से वापस हो रहा हूँ। और साथियों मुझे यह जानकारी प्राप्त होने पर खुशी हुई है अच्छा लगा है की नाशिक डिवीजन में अब सिविल और मिलिट्री एविएशन दोनों के लिए एक साथ एमआरओ मेंटेंस रिपेयर एंड ओव्हरहॉल की सुविधा स्थापित की गई है। यह दिखाता है की भारत में अब सिविल और मिलिट्री एविएशन दोनों ही एक प्लेटफॉर्म पर मिलकर आगे बढ़ रहे हैं। इस नई शुरुआत के साथ मैं ये भी विश्वास के साथ कह सकता हूँ। इससे नासिक और आसपास के क्षेत्रों में हजारों की संख्या में नए रोजगार के अवसर जॉब**

**अपॉर्च्युनिटीज भी क्रिएट होंगे। यहां के नौजवानों के लिए ट्रेनिंग और एम्प्लॉयमेंट के भी नए रास्ते खुलेंगे और महाराष्ट्र और पड़ोसी राज्यों का भी इंडस्ट्रियल इको सिस्टम इससे और ज्यादा मजबूत होगा।**

**पूरग्रस्त मदत**

मागील महिन्यात राज्याच्या विविध भागात झालेल्या अतिवृष्टी आणि पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांच्या मदतीसाठी 1 हजार 356 कोटी रुपयांची मदत वितरित करण्यात येणार आहे. मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी काल ही माहिती दिली. सातारा, कोल्हापूर, बीड, धाराशिव, लातूर, परभणी आणि नांदेड जिल्ह्यातील 21 लाख 66 हजार 198 शेतकऱ्यांच्या बाधित पिकांसाठी ही मदत दिली जाईल. या बाबतचा शासन निर्णय जारी करण्यात आला आहे. नैसर्गिक आपत्तीत मृत्यू झालेल्या व्यक्तींच्या वारसांना तसंच पशुधनाचं नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आणि घरांची पडझड झालेल्या नागरिकांना थेट जिल्हास्तरावरूनच मदत दिली जाणार आहे.

**टीका**

अतिवृष्टीची झळ बसलेल्या शेतकऱ्यांना राज्य सरकारनं केलेली मदत तुटपुंजी असल्याची टीका ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी केली आहे. या शेतकरी वर्गाबद्दल सहानुभूती व्यक्त करण्यासाठी त्यांच्या पक्षानं दिवाळी साजरी न करण्याचा निर्णय घेतला आहे, असं त्यांनी काल बारामती इथं वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. राज्य सरकार हेक्टरी फक्त 10 हजार रुपयांची मदत देत आहे, अशी टीका काँग्रेसचे विधीमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी केली आहे.

**रब्बी नियोजन**

यंदाच्या हंगामात रब्बी पीकांचं क्षेत्र 57 वरुन 65 लाख हेक्टरपर्यंत वाढण्याची शक्यता आहे. त्यामुळं रब्बी हंगामाचं नियोजन अधिक सक्षम आणि समन्वित पद्धतीनं करण्याच्या सूचना कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी काल पुण्यात दिल्या. भरणे यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय नियोजन बैठक झाली. या बैठकीत राज्यातील रब्बी हंगामाच्या अनुषंगानं सविस्तर आढावा घेण्यात आला.

**दिवाळी**

दीपावलीच्या मंगल पर्वाला प्रारंभ झाला असून सर्वत्र चैतन्याचं वातावरण आहे. काल वसुबारसचेनिमित्त सर्वत्र गाय वासरांची पूजा करण्यात आली. नंदुरबार शहरात गाय वासराच्या प्रतिमेचं काल अनावरण करण्यात आलं. आज धनत्रयोदशीला लक्ष्मी आणि कुबेर यांची पूजा केली जाते. तसंच धन्वंतरी पूजनही आज केलं जातं. दिवाळीनिमित्त राज्यात ठीकठिकाणी दीपोत्सवाचं आयोजन करण्यात येत आहे.

**डिजिटल अटक**

डिजिटल अटकेचा बहाणा करून मुंबईतल्या एका व्यावसायिकाचे 58 कोटी रुपये लुटणाऱ्या 3 आरोपींना महाराष्ट्र सायबर पोलिसांनी अटक केली आहे. दरम्यान सर्वोच्च न्यायालयानं 'डिजिटल अटक' या सायबर गुन्ह्याबाबत गंभीर दखल घेत केंद्रीय अन्वेषण संस्थेकडून उत्तर मागितलं आहे. हरयाणातल्या अंबाला इथल्या एका ज्येष्ठ नागरिक महिलेच्या तक्रारीनंतर सर्वोच्च न्यायालयाने ही दखल घेतली आहे.

**नक्षल आत्मसमर्पण**

छत्तीसगडमधील बस्तर विभागाचा मुख्य भाग असलेल्या जगदलपूरमध्ये काल 210 नक्षलवाद्यांनी त्यांच्या शस्त्रांसह आत्मसमर्पण केलं. छत्तीसगडच्या इतिहासातील नक्षलवाद्यांचं हे सर्वात मोठं आत्मसमर्पण आहे. यामध्ये माओवादी संघटनेच्या अनेक प्रमुख नेत्यांचा समावेश आहे. गेल्या 22 महिन्यांत छत्तीसगडमध्ये 2000 हून अधिक

नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पण केलं आहे. मार्च 2026 पर्यंत देशाला नक्षलमुक्त करण्याचा केंद्र सरकारचा संकल्प पूर्ण करण्यात कालच्या दिवसाचं योगदान मोठं आहे.

**पुणे मनपा**

पुणे महापालिकेमध्ये समाविष्ट करण्यात आलेल्या अकरापैकी 9 गावांचा प्रारूप विकास आराखडा काल जाहीर करण्यात आला. या गावामधील साधारणतः 5 हजार 500 हेक्टर क्षेत्रापैकी 374 हेक्टर क्षेत्रावर आरक्षणे प्रस्तावित केली आहे. तर 42 टक्के क्षेत्र रहिवासी विभागात सामाविष्ट करण्यात आलं आहे. या प्रारूप आराखड्यावर येत्या 60 दिवसात हरकती सूचना नोंदवता येणार आहेत.

**पीकविमा-सिंधुदुर्ग**

फळपीक विमा योजनेअंतर्गत सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या पात्र शेतकऱ्यांना 90 कोटी रुपयांची पीकविमा नुकसान भरपाई वितरित करण्यास सुरुवात झाली आहे. पीकविमा नुकसान भरपाई वितरित करणारा सिंधुदुर्ग हा राज्यातील पहिला जिल्हा ठरला आहे.

**मोर्चा-बीड**

बीडमध्ये काल ओबीसी महाएल्गार सभा आयोजित करण्यात आली होती. आरक्षण सामाजिक दृष्ट्या मागासलल्यासाठी आहे. तो गरिबी हटावचा कार्यक्रम नाही. आम्ही पक्षाच्या दावणीला बांधलो नाही. इथे फक्त ओबीसीसाठी लढा देत आहोत असं ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी यावेळी सांगितलं. तर, मराठा आरक्षणाला आमचा विरोध नाही, पण त्यांना वेगळे आरक्षण द्या असं धनंजय मुंडे म्हणाले. गरीब मराठा समाजाच्या विरोधात आम्ही कधीच नाही. त्यांना वेगळे आरक्षण आहे, आमचा त्याला विरोध नाही असं गोपीचंद पडळकर यांनी सांगितलं.

**कर्डिले निधन- अहिल्यानगर**

अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार शिवाजीराव कर्डिले यांचं काल अल्पशा आजारानं निधन झालं. ते 65 वर्षाचे होते. त्यांच्या पार्थिवावर बुऱ्हाणनगर इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. आमदार कर्डिले यांच्या निधनामुळे जनसामान्यांशी नाळ जोडलेलं, तळागाळातील घटकांच्या विकासासाठी झटणारं नेतृत्व हरपलं आहे, अशा शब्दात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कर्डिले यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे. तर कर्डिले त्यांच्या निधनाने एक लोकाभिमुख आणि संवेदनशील नेतृत्व हरपल्याची शोकभावना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल कर्डिले यांच्या निवासस्थानी त्यांच्या कुटुंबीयांची भेट घेऊन सांत्वन केलं.

**हवामान**

कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी आज पावसाची शक्यता असून विदर्भात हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.

## नमस्कार